# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

**( परीक्षा विभाग )**



एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३१०४


जा.क्र./गों.वि./प.वि./1552/२०१५ दि. १२/०८/२०१५

## अधिसुचना

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी संलग्नीत सर्व महाविद्यालयातील, प्राचार्य तथा संबंधीताना कळविण्यात येते की, सत्र **२०१५–१६** करीता महाविद्यालयीन प्रवेश तसेच नामांकनाबाबत विद्यापीठाचे **संदर्भीय परिपत्रक जा.क्रं./गों.वि./परीक्षाविभाग/१४८१/२०१५** दिनांक **३/०८/२०१५** ला संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहे. त्यानुसार महाविद्यालयांनी दिनांक **०६/०८/२०१५** पर्यंत प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांचे नामांकन प्रस्ताव दिलेल्या मुदतीस सादर करावे,

तसेच **विद्या विभाग यांची अधिसुचना संदर्भ जा.क्र./गोंविग/विद्या/३२१/२०१५, दि. ०७/०८/२०१५ अन्वये मा. कुलगुरू महोदय यांचे परवानगीने दि. ०६ सप्टेंबर २०१५ पर्यंत संबंधीत महाविद्यालयाना प्रवेशास मुदत वाढ देण्यात आलेली आहे.** करीता सदरच्या मुदती पर्यंत प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे नामांकन शुल्काचा धनादेश ( **D.D.**) दिनांक ०७/०९/२०१५ पर्यंतचा काढून दिनांक **१० सप्टेंबर २०१५** पर्यंत विद्यापीठात सादर करावे.

वरील नामांकना संबंधी देण्यात आलेली अंतिम मुदत संपल्यानंतर सादर केलेल्या नामांकनास **विद्यापीठ अधिसुचना संदर्भ क्रं./No./ GU/FAO/७४३६ दि. १९/०९/२०१३** नुसार **प्रति विद्यार्थी प्रति दिवस रू. २५/– प्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात येईल** याची संबंधीत सर्व **महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.**

त्याचप्रमाणे **केंद्रीय प्रवेश समीतीद्वारे, तसेच** तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे द्वारा केल्या जाणाऱ्या प्रवेशा बाबत जाहीर केलेल्या दिनांक पासून व्यावसायीक अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रिया घोषीत केलेल्या अंतिम तारखेपर्यंत पुर्ण करून संबंधीत महाविद्यालयांनी नामांकन शुल्काचा धनादेश ( **D.D.**) काढून आवश्यक दस्ताऐवज व प्रपत्रासह १० दिवसाच्या आत विद्यापीठात सादर करावे. अंतिम मुदत संपल्यानंतर सादर केलेल्या नामांकन वरील संदर्भीय ( दि. १९/०९/२०१३ ) च्या अधिसुचनेनुसार विलंब शुल्क आकारण्यात येईल याची संबंधीत महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

परीक्षा नियंत्रक,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी:–

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. संचालक, महाविद्यालयीन विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) उपकुलसचिव विद्या विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

उपकुलसचिव
( परीक्षा पुर्व विभाग )
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली